**नि.फौ.प्र.क्र.५३४/२०२१**
सरकार वि. श्रध्दा
**नि. क्र.३५**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.५ यांची शपथेवर सरतपासणी सुरु</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | मोहम्मद जुबेर अब्दुल अहीम अंसारी |
| वय | : | ४१ वर्षे |
| व्यवसाय | : | ऑटोचालक, |
| राहणार | : | मोमिनपुरा, नागपूर. |

**<u>सरतपासणी– सरकार तर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून</u>**

१. मला प्रकरणात समंस मिळाले व मी आज या प्रकरणात साक्ष देण्यास हजर झालो. मी आरोपीस ओळखत नाही. मला घटनेबाबत काही माहिती नाही. असे काही घडले नाही की, आरोपीने माझे कडे सोने गहाण ठेवण्याबाबत मला विचारणा केली होती. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे, त्यास फितुर घोषीत करुन, साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्यास सरकारी अभियोक्ता यांनी परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली</u>**.

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. १७.१०.२०२० रोजी आरोपी श्रध्दा ही ऑटोमध्ये बसून आली होती व तीने सोन्याचे दागीने गहाण ठेवून २००००/– ची मागणी केली होती. त्यानंतर मी तिला शकील अंसारी याचे कडे घेवून गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर शकील अंसारी याने तिचेकडुन दागीणे घेवून तिला रक्कम रुपये २०,०००/– दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला भाडयाचे रक्कम रुपये ३००/– दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला असे सांगीतले होते की, उपरोक्त दागीने हे चोरीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने तिचे भावाला कॅन्सर आहे असे खोटे सांगून तिचे आईचे दागीने आहे असे भासवून रक्कम् रुपये २०,०००/– घेतले होते. मी आरोपीला बघीतल्यास ओळखू शकतो.

**<u>उलटतपासणी – श्री. एस.एम.माटे वकील आरोपी करीता</u>**

३. पोलीस माझेकडे घटनेच्या अंदाजे ८ दिवसाअगोदर आले होते. पोलीसांनी माझा जबाब कोठे नोंदविला हे मला आठवत नाही. असे घडले नाही की, पोलीसांनी माझा जबाब घटनेच्या १५ दिवसानंतर नोंदविला होता. असे घडले नाही की, पोलीसांनी फक्त मला नांव व पत्ता विचारला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझेकडे आली तेव्हा मला तिचे नांव माहित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला सर्व सवा–यांचे चेहरे लक्षात राहत नाही. मला आरोपीचे नांव श्रध्दा असल्याचे आता माहित झाले. हे म्हणणे खरे आहे की, आतापर्यत मला माझे जबाबतील मजकूर मला माहित नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी आज प्रथमतः माझा जबाब वाचला आहे. मी पोलीसांना आरोपीचे वर्णन सांगीतले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कधीही माझेकडे आली नाही व तीने कधीही काहिही गहाण ठेवले नाही व तिला कोणतिही रक्कम दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>फेरतपास – काही नाही</u>.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**माझे समक्ष,**

स्वा/–
(एस. एस. बोस )
मुख्य न्यायदंडाधिकारी,
<u>नागपूर</u>

दिनांकः– ०८.१०.२०२५